**नियमित दिवाणी मुकदमा .क्र. ५९६/२०२३**
**अप्पासाो घाडगे इ. ५ वि. नागनाथ बंडगर इ. ३**

## निशाणी क्र.५ कडील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांचेविरुध्द दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे प्रतिवादी क्र १ ते ३ यांचे विरुध्द तुर्तातुर्त ताकीद मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

**दावा मिळकतीचे वर्णन –**

०२. जि. सोलापुर ता. माळशिरस पैकी मोजे मिरे येथील खालील वर्णनाच्या जमीनी–

| | गट नंबर | क्षेत्र हे. आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| अ) | २२३ | ००–८८ | ००–९५ |
| | | पो.ख. ०–१० | |
| ब) | २२४ | ००–४९ | ००–५५ |
| | | पो.ख. ०–०४ | |
| क) | २२५/२ | ०२–८४ | ०३–१५ |
| | | पो.ख. ०–५१ | |
| ड) | २२२ | ०१–१३ | ०१–२५ |
| | | पो.ख. ०–१२ | |

वर नमुद केलेल्या मिळकतींपैकी १अ व १ब मध्ये नमूद केलेल्या मिळकती यातील वादी व प्रतिवादी क्र ११ यांच्या मालकीच्या आहेत. तर दावा कलम १क व १ड मध्ये नमूद केलेल्या मिळकती यातील प्रतिवादी क्र ४ ते ७ व ८ ते १० यांच्या मालकीच्या आहेत. सदर मिळकतींचे बांधावरुन दक्षिण–उत्तर चालीचा रस्ता मागितलेला आहे. हा दाव्याचा वाद विषय आहे.

| | गट नंबर | क्षेत्र हे. आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| इ) | २२८/१ | ००–८२<br>पो.ख. ०–४० | ००–८० |
| ई) | २२८/२ | ०१–१४<br>पो.ख. ०–४० | ०१–२० |

तर दावा कलम १इ मध्ये नमूद केलेली मिळकत प्रतिवादी क्र २ व प्रतिवादी क्र ३ यांचे नांवे आहे. तर दावा कलम १ई मध्ये नमुद केलेली मिळकत प्रतिवादी क्र १ यांचे नांवे आहे. या दाव्यासोबत जोडलेला कच्चा हातनकाशा या दाव्याचा एक भाग समजणेत यावा.

०३. **<u>वादीचे थोडक्यात कथन असे की</u>** – तहसिलदार, माळशिरस यांनी प्रतिवादी क्र १ ते ३ यांचेशी हातमिळवणी करुन रस्ता अर्ज मंजूर करुन घेतला आहे. तहसिलदार यांनी रस्ता केसचा निकाल देतेवेळी जर नुकसान होत असेल तर नुकसान भरपाई निश्चित करणे कायद्याने बंधनकारक आहे. तसेच पर्यायी रस्ता उपलब्ध आहे किंवा नाही याबाबत पाहणी करणे आवश्यक असते तसेच रस्ता मंजूर करताना इतर कोणत्या बांधावरुन रस्ता मंजूर केल्यास सोईचे व कमी नुकसानीचे हाणार आहे याबाबतही स्पष्टपणे पंचनामा करणे आवश्यक आहे परंतु तहसिलदार यांनी तशी काणतीही खबरदारी घेतलेली दिसून यते नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र १ ते ३ यांनी दिनांक २३.०१.२०२३ रोजीच्या हुकूमानुसार वादीच्या मिळकतीतून नवीन रस्ता निर्माण केल्यास, बांधावरील संपूर्ण झाडे तोडून टाकल्यास व इले.डेपोचे नुकसान केल्यास वादी यांचे पिकांचे पाणी बंद होणार आहे व ऊस पिकांचे नुकसान होणार आहे. तसेच १५ फूट रस्ता काढल्यास पिकांचेही नुकसान होवून जवळ–जवळ २ ते ३ लाख रुपयांचे नुकसान होणार आहे व रस्त्याखाली वादीचे साधारणपणे ८ ते १० आर क्षेत्राचे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना वेळीच कायद्याने रोखणे आवश्यक आहे त्यामुळे तहसिलदारांच्या निकालावरुन प्रतिवादी नं १ ते ३ यांनी वादीच्या दावा मिळकतीत नवीन

रस्ता काढु नये व नवीन रस्त्याचा हक्क प्रस्तापीत करु नये अशी प्रतिवादी विरुध्द तुर्तातुर्त ताकीद मिळण्यासाठी वादीनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

०४. प्रस्तुत प्रकरणातील प्रतिवादी क्र १ ते ३ यांना समन्स व नोटीसची बजावणी होवून ते प्रकरणात हजर झाले. नि. क्र. १४ अन्वये प्रतिवादी क्र १ ते ३ यांनी प्रकरणात म्हणणे सादर केले. प्रतिवादी क्र १ ते ३ यांचे असे कथन आहे की, तहसिलदार यांनी सर्व पाहणी करुन, पंचनामे करुन, जाबजबाब नोंदवुन प्रतिवादींचे कमीत कमी नुकसान होणारा रस्ता म्हणून प्रतिवादी क्र १ ते ३ यांना सदरचा रस्ता मंजूर केलेला आहे, त्यामध्ये हस्तक्षेप करण्यासारखे कोणतीही वस्तुस्थिती नाही. तहसिलदार माळशिरस यांच्याकडे अर्ज करतांना प्रत्यक्षात सदर बांधानजिक कोणताही विद्युत डि.पी. अगर पोल मंजूर नव्हता, परंतु केवळ प्रतिवादी क्र १ ते ३ यांना हरकत व्हावी या उद्देशाने वादींनी अर्ज प्रलंबित असताना रस्त्यालगत विद्युत पोल व डि.पी. यांची उभारणी केल्याचे निदर्शनास आल्याने ती बाब विचारात घेवून तहसिलदार यांनी त्यांचे निष्कर्ष कलम ३ मध्ये सदरचा विद्यंत डेपो व इले. पोल महावितरण कार्यालयाकडुन दुर करुन रस्ता देणे उचित होणर असुन, त्याचा होणारा खर्च प्रतिवादी क्र१ ते ३ यांनी करणे आवश्यक आहे म्हणून स्पष्ट कारण मिमांसा दिलेली आहे. तयामुळे वादी त्यांचे सोयीसाठी काढत असलेला गैरअर्थ कायदेशीर नाही. जमीन महसुल कायदा कलम १४३ अन्वये अंतर्गत भागातील शेतकऱ्यास सव्हे नंबरचे म्हणजेच आताचे गट नंबरचे बांधाने कमीत कमी नुकसान होणारा व सोयीचा रस्ता मंजुर करणे हे कायद्यास अभिप्रेत आहे. कलम १४३ अन्वये रस्त्यासाठी क्षेत्र संपादन करणे अथवा नुकसान भरपाई देणे अशी तरतुद नाही आणि वादींचे हरकतीवरुन पुर्वपारचा असणारा रस्ताच प्रतिवादींचे वहिवाटीसाठी मंजूर केल्याने वादी अगर अन्य प्रतिवादी यांचे कोतेही नुकसान होणार नाही. प्रतिवादी क्र १ हा पर–तालुक्यातील रहिवाशी असुन, प्रतिवादी क्र ३ ही महिला तर प्रतिवादी क्र २ हा वयस्कर शेतकरी असुन त्यांची मिळकत अंतर्गत भागात असल्याने रस्त्याअभावी पड पाडल्यास मिळकत विक्री करतील

म्हणून सर्वांनी संगनमताने त्यांचा रस्ता अडविलेला आहे. तथापी आता कायदेशीर मार्गाने सदरचा रस्ता मंजुर झाल्यावर पण कामकाज लांबवण्यासाठी केवळ जाणीवपुर्वक वादींनी खोटा दावा केलेला आहे, तो खर्चासह रद्द करण्यात येवुन प्रतिवादींना विनाकारण खर्चात पाडले म्हणून रक्कम रु २५,०००/– खर्च वसुल होवुन मिळावा अशी विनंती केली.

०५. वादी व प्रतिवादी यांच्यातील परस्परविरोधी कथनांचा विचार करता, नि ५ चे अर्जाच्या अंतिम निष्कर्षास येण्याकरिता खालीलप्रमाणे मुद्दे माझे विचाराधीन निर्माण झाले. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादीने सकृतदर्शनी केस सिध्द केली आहे काय ? | नाही |
| २ | वादीने अनुकूलतेचा कल त्याच्या बाजूने असल्याचे सिध्द केले आहे काय ? | नाही |
| ३ | वादीस तुर्तातुर्त मनाई नाकारल्यास त्याचे अपरिमित नुकसान होणार असल्याचे सिध्द केले आहे काय ? | नाही |
| ४ | काय आदेश ? | अर्ज नामंजूर करण्यात येत आहे. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र १ ते ३ करिता</u>** –

०६. वादीतर्फे निशाणी क्र. ४ कडे मौजे मिरे येथील गट क्र २२३, २२४, २२५/२, २२२, २२८/१, २२८/२ चे ७/१२ उतारे तहसिलदार, माळशिरस यांचा रस्ता केस नं एसआर/१४/२०२० च्या निकालपत्राची सही–शिक्याची नक्कल, रस्ता मागणी अर्जाची प्रत,

अपिल क्र २६/२०२० मध्ये सामनेवाले यांनी दिलेले म्हणण्याची प्रत, पंचनामा प्रत, केसमध्ये त्रयस्त अर्जदार यांनी दिलेला अर्ज, रस्ता केस क्र एस.आर/१४/२०२० मध्ये दिलेल्या लेखी म्हणण्याची प्रत, उपसंचालक सोलापूर भुमिअभिलेख कार्यालय पुणे यांना दिलेल्या अर्जाची प्रत, रस्ता अपिल क्र २६/२० मध्ये दिलेल्या लेखी युक्तीवादाची प्रत तसेच निशाणी क्र २३ खाली तहसिलदार यांनी दिलेल्या पोलीस मदतीच्या आदेशाची प्रत तसेच निशाणी क्र २६ खाली मा. उच्च न्यायालय, मुंबई (नागपूर खंडपीठ) डब्लू पी क्र ५७६५/२०१० ची आदेशाची प्रत दाखल केली आहेत.

०७. प्रतिवादी तर्फे निशाणी क्र २५ कडे रस्ता मागणी अर्ज १६१७/२०२० मधील अर्जाची प्रत, पंचनामा व फोटो तसेच निशाणी क्र २८ कडे साक्षीदारांची प्रतिज्ञापत्रे दाखल केली आहेत.

०८. वादींतर्फे वकील श्री. एस एस निंबाळकर व प्रतिवादी क्र १ ते ३ तर्फे वकील श्री. एस. बी. देव यांचा युक्तीवाद ऐकला. वादी यांनी अर्जाअनुरुप व प्रतिवादीच्या वकीलांनी अर्जास दाखल म्हणण्या अनुरुप युक्तीवाद केला.

०९. प्रतिवादी क्र १ ते ३ यांनी निशाणी क्र ३२ अन्वये त्याचा लेखी युक्तीवाद सादर केला, प्रतिवादी क्र १ ते ३ यांचा असा युक्तीवाद आहे की, वादींनी मंजूर रस्त्याच्या ठिकाणी आप्पासाहेब घाडगे वगैरे लोकांची घरे असुन विद्युत खांब व विद्युत डि.पी. जेसीबीने पाडून टाकून पोलीस मदतीने पाईपलाईन फोडून टाकून नवीन रस्ता करण्याचा धोका असल्याचा युक्तीवाद आहे. परंतु वादीचा दावा व मनाई अर्ज आणि आप्पासाहेब घाडगे वगैरे लोकांनी केलेला रेमुनं ५८७/२०२३ या दोन्ही दाव्यात मंजूर रस्त्याचे क्षेत्रावर त्यांची घरे असल्याचा मजकूरच नसल्याने व तसा कोणताही पुरावा अभिलेखावर नसल्याने वादीचा युक्तीवाद कायदेशीर नाही. तहसिलदार यांच्या कडील रस्ता प्रकरणात संभाव्य रस्त्यावर राहती वस्ती अगर पाईपलाईन असल्याचा कोणताही पुरावा अगर म्हणणे सादर केले नाही तसेच तशी

वस्तुस्थिती दोन्ही वेळच्या स्थळपाहणी पंचनाम्यात देखील आढळून आलेली नाही. प्रतिवादी क्र १ ते ३ यांनी तहसिलदार माळशिरस यांच्या कोर्टात रस्ता मागणी अर्ज केल्यानंतर वादी व प्रतिवादी क्र ४ ते १४ हे सर्वजण त्यांच्या वकीलांसह हजर होते. त्यांनी त्यांचे म्हणणे व जबाब दिलेले आहेत. तसेच त्यांच्या उपस्थितीत दिनांक २४.०३.२०२१ व ११.०५.२०२२ रोजी तहसिलदार माळशिरस यांनी दोन वेळा समक्ष स्थळपहाणी करुन त्यांचे पंचनामे केलेले आहेत. तसेच सदर पंचनामे वादीने नाकारलेली नाहीत.

१०. प्रतिवादी क्र १ ते ३ यांनी निशाणी क्र २५ वर तहसिलदार, माळशिरस यांनी दिनांक २४.०३.२०२१ व दिनांक ११.०५.२०२२ रोजी वाद मिळकतींवर प्रत्यक्ष जावून केलेल पंचनामे अभिलेखावर दाखल केले आहेत. प्रस्तुत पंचनाम्यामध्ये वादीचे घर व गोठा प्रस्तावीत रस्त्यावर असल्याचे नमुद नाही. तसेच प्रस्तुत पंचनाम्याच्यावेळी संपदाबाई बजबळकर व वादी आप्पासाहेब घाडगे हे त्या पंचनाम्याच्यावेळी तहसिलदार, माळशिरस यांच्या समक्ष उपस्थित असल्याचे दिसून येते व त्यांनी प्रतिवादी क्र १ ते ३ यांना त्यांच्या जमीनीत येण्या जाण्यासाठी पर्यायी रस्ता नसलेबाबत तहसिलदार यांच्या समक्ष सांगीतल्याचे नमुद आहे. त्यामुळे पर्यायी रस्ता उपलब्ध नसल्याने तहसिलदार, माळशीरस यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४३ नुसार वापरलेले अधिकार कायदेशीर असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच तहसिलदार यांच्या आदेशामध्ये देखील पर्यायी रस्त्याबाबतचे विवेचन केलेले असून प्रतिवादी क्र १ ते ३ यांना पर्यायी रस्ता उपलब्ध नसल्याचे नमुद केले आहे. तसेच गट क्र २२२ व २२३ मध्ये बांधालगत इलेक्ट्रीक डिपी व इलेक्ट्रीक पोल महावितरण कार्यालयाकडून दूर करुन घेण्याचा खर्च प्रतिवादी क्र १ ते ३ यांनी सोसावा असे आदेश पारीत केलेले असल्यामुळे त्याची तोशीष वादी व इतर प्रतिवादींना नसल्याचे दिसून येते.

११. वादी यांनी ***मा. उच्च न्यायालय मुंबई (नागूपर) यांचे डब्लू.पी. क्र ५७६५/२०१० कृष्णा चौधरी वि. अति. कमिशनर, नागपूर*** या न्यायनिवाड्याचा आधार घेतला असून, त्यामध्ये पुढील प्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

> *"In view of this, the order passed by the Tahsildar to the extent it directs removal of obstruction created by the respondent No 2 over the boundaries of Survey No 427 and 429 cannot be sustained. The authorities below have committed an error in maintaining the said order. However, no fault can be found that the order passed by the authorities under section 143, declaring that there subsist a way on the boundaries of Survey Nos 427 and 429. In the result, the writ petition is allowed. The orders passed by the authorities below are quashed and set aside only to the extent that it directs the removal of obstruction in the way through boundaries of Survey Nos 427 and 429. The parties are at liberty to adopt all such proceedings as are available to the in law and the observations by the authorities below on the question of removal of obstruction shall not come in the way of authorities. "*

वरील मा. नामदार उच्च न्यायालयाच्या न्यायनिवाड्याचे अवलोकन केले असता, त्यातील तथ्ये सदर अर्जातील तथ्यांशी वेगळी असल्याने या न्यायालयाचे नम्र अभिप्राय आहे की, वरील न्यायनिवाडा हा प्रस्तुत अर्जाला लागू होत नाही.

१२. उपरोक्त विवेचनानुसार प्रथमदर्शनी तहसीलदार यांनी पारीत कलेले आदेश कायदेशीर असल्याचे दिसून येते. त्यामुळे मी या निष्कर्षास येत आहे की, वादीच्या लाभात प्रथमदर्शनी केस नाही व अनुकुलतेचा कल हा प्रतिवादी क्र १ ते ३ यांच्या बाजूने असल्याचे सिध्द होते. वादीच्या लाभात मनाई हूकूम दिल्यास प्रतिवादी क्र १ ते ३ यास प्राप्त झालेल्या

रस्त्याच्या हक्कास बाधा येणार आहे. त्यामुळे प्रतिवादीस कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे.  सबब, मी मुद्दा क्र १ ते ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र ४ साठी** –

१३. मी मुद्दा क्र १ ते ३ चे उत्तर नकारार्थी दिल्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी मुद्दा क्र ४ करिता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा नि.क्र. ५ कडील अर्ज नामंजूर करण्यात येतो.

(न्यायासनावर निवेदीत आणि अधीघोषीत)

sd/–

(एम. एन. पाटील )

दि. ०८/११/२०२३

४ रे  सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर,

माळशिरस.

## C E R T I F I C A T E

I affirm that, the contents of this PDF file order are same word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| **Name of the Court** | **:** | 4th Jt. C.J.J.D & J.M.F.C., Malshiras. |
| **Name of Stenographer** | **:** | Praveen Nagnath Nalla (Grade III) |
| **Order signed by the Presiding Officer on** | **:** | 08 / 11 / 2023. |
| **Order uploaded on** | **:** | 08 / 11 / 2023. |